[वेळ : 3.00 तास ] [गुण : 100]

कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.

**सूचना : १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**
**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.**
**३. प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.**

**प्र. १ अ.** अनुकृती सिद्धांताबद्दल ॲरिस्टॉटल व प्लेटो यांनी मांडलेल्या विचाराची विस्ताराने चर्चा करा. २०

**किंवा**

**ब.** पाश्चात्य अभ्यासकांनी केलेल्या व्याख्यांमधील वर्डस्वर्थ, कोलरीज, कोर्टहॉप व अर्नोल्ड यांच्या व्याख्या सांगून त्याचे स्पष्टीकरण करा.

**प्र. २ अ.** रूपक, प्रतीक आणि प्रतिमा हे घटक साहित्य भाषेला कसे विशिष्टपूर्ण बनवतात ते साधार लिहा. २०

**किंवा**

**ब.** ‘अनेकार्थता’ व ‘अपरिचितीकरण’ या संकल्पनांच्या आधारे साहित्यभाषेचे स्वरूप साधार स्पष्ट करा.

**प्र.३ अ.** पाश्चात्य अभ्यासकांनी साहित्य निर्मिती प्रक्रियेसंबंधी सांगितलेल्या ‘आत्माविष्कार’ आणि ‘जीवनभाष्य’ या दोन साहित्य प्रयोजनांचा विस्ताराने आढावा घ्या. २०

**किंवा**

**ब.** कोलरिजने मांडलेल्या कल्पनाशक्तीचा सिद्धांत व चमत्कृतीशक्ती सिद्धांत यांच्या कार्याचे स्वरूप नोंदवा.

**प्र. ४ अ.** साहित्याच्या आस्वाद प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या कॅथॅर्सिस संकल्पनेचे महत्त्व सांगून लेसिंग, मिल्टन व क्रोचे यांनी सांगितलेला अर्थ नमूद करा. २०

**किंवा**

**ब.** साहित्याच्या आस्वादप्रक्रिया आणि रिचर्डसचा 'प्रेरणा संतुलनाचा सिद्धांत' यांचा परस्पर संबंध स्पष्ट करा.

**प्र.५** पुढीलपैकी कोणत्याही **दोन टिपा** लिहा. २०

**अ.** एडगर ॲलन पो यांची काव्य व्याख्या
**ब.** साहित्याची भाषा आणि नियमोल्लंघन
**क.** साहित्याचे प्रयोजन – सामाजिक बांधिलकी
**ड.** बुचरने सांगितलेला ‘कॅथॅर्सिस’ संकल्पनेचा अर्थ

**************



XROYADMINYBE0349XROYADMINYBE0349XROYADMINYBE0349XROYADMINYBE0349